**फौ.कि.अर्ज क्रमांक ८८/२०२५**

**फिर्यादीचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २२३ प्रमाणे सत्यापन शपथेवर सुरू :**

मी शंकर खंडेराव इंगुळकर : वय: ७५ वर्ष. धंदा : निरंक, निवासस्थान: कामथडी, ता. भोर, जि. पुणे, याद्वारे शपथेवर कथन करते की,

२. माझा मुलगा कैलास हा मतिमंद आहे. सन २०१२ ते २०१३ मध्ये मी पुणे ते सातारा रोड लगत मौजे कामथडी येथे हॉटेल व्यवसायाच्या निमित्ताने बांधकाम करून मुलाच्या भविष्याच्या तरतुदीसाठी हॉटेल भाडयाने दिले. चार ते पाच हॉटेल व्यवसायिक सदर हॉटेल चालवुन सोडुन गेले होते. ते मला महिना चाळीस हजार रूपये भाडे देत होते. अभिजीत अंगोळकर याने हॉटेल भाडयाने घेण्यापुर्वी सुनिल चांदवानी व जयकिसन गनवानी हे हॉटेल चालवित होते. त्यांनी हॉटेल सोडवयाचे आहे असे मला तोंडी सांगितले होते. त्यामुळे कायमस्वरूपी भाडेकरू मिळावा ही माझी गरज होती. अशावेळी अभिजीत अंगोळकर मला भेटले व त्यांनी मला हॉटेलचे नुतनीकरण करून हायप्रोफाईल फुड कोर्ट चालविण्यासाठी भाडयाने हॉटेल चालवितो, नुतनी करणाचा खर्च मी करावा असे त्याने मला सांगितले. त्याकरीता रूपये १८,९०,८५०/— चा प्रस्ताव दिला. तसेच त्याने पैसे देण्याच्या स्अेजेस देखील नमुद केल्या होत्या. त्यानुसार मी जुलै २०२३ मध्ये रोख रक्कम १५,०००/— व १६,८६,०००/— ही रक्कम जुलै २०२३ पासुन मार्च २०२४ पर्यंत ऑनलाईन दिली. सदर नुतनीकरणाचे काम त्याने सप्टेंबर २०२३ पर्यंत पुर्ण करावयाचे होते व ऑक्टोबर २०२३ पासुन भाडे ४०,०००/— द्यावयाचे होते. त्यानुसार त्याने काम पुर्ण केले नाही. एकुण रकमेच्या केवळ २०टक्के काम पुर्ण केले. त्याने ३,७८,१६६/— रूपयांपर्यंतचे काम त्याने पुर्ण केले. त्याने ९० टक्के रक्कम उकळलेली आहे. त्याने ६० टक्के रक्कम इतरत्र वापरली. त्यानंतर त्याने जुलै २०२४ पासुन काम बंद केले. तसेच अस्तित्वात असलेल्या शेड चे पुर्णपणे नुकसान केले. तसेच त्याने माझे दोन वर्षाचे भाडे देखील मला दिले नाही. त्यामुळे दोन वर्षानंतर मी दुस—या भाडेकरूला राहिलेले सामान घेउन डागडुजी करून हॉटेल भाडयाने दिले. ऑक्टोबर २०२५ पासुन मी हॉटेल ४०,०००/— महिना भाडेतत्वावर दिले. सदर भाडेकरू मला व्यवस्थित भाडे देत आहे. मला कुठल्याही खर्चाची तुरशिस लागलेली नाही.

३. सदर अभिजीत अंगोळकर याने माझी आर्थिक फसवणुक केली माझ्या चालु हॉटेलचे नुकसान केले. शिल्लक मटेरियलचे संरक्षण केले नाही. त्यामुळे माझे हॉटेल मधील

साहित्य चोरील गेले. त्यामुळे माझे ६० टक्के रकमेचे त्याने नुसान केले आहे. म्हणुन मी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. यापुर्वी मी राजगड पोलिस स्टेशन येथे त्याच्याविरूध्द तक्रारी अर्ज दाखल केला होता. परंतु त्यांनी माझ्या तक्रारी अर्जाची दखल घेतली नाही. त्यामुळे अभिजीत अंगोळकर याच्यावर योग्य ती कार्यवाही होउन मला न्याय मिळावा ही विनंती. त्याने मुळ ॲग्रीमेंट फ्रॉड केलेला आहे.

फिर्यादीची सही

........................

श्रवणोत्तर स्वीकृत,

02.02.26

**( मीना वा. जाधव )**
प्र.वर्ग न्यायदंडाधिकारी
भोर, पुणे.

दिनांक :—०२/०२/२०२६